आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – दुपारी ३ वाजता

३ ऑक्टोबर २०२३ – मंगळवार

राज्याच्या नऊ जिल्ह्यांमध्ये सोयाबीनच्या पिकावर पडलेल्या विषाणूजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभाग आणि मदत आणि पुनर्वसन विभागानं तातडीनं सोयाबीन पिकाचे पंचनामे सुरु करावेत असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीत दिले. पाऊस आणि तापमानाच्या बदलत्या स्वरूपामुळे यंदा चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, सोलापूर, लातूर, वाशिम,नांदेड या जिल्ह्यांत सोयाबीन पिकावर रोगाचा प्रादुर्भाव दिसत आहे.

यंदाच्या दिवाळीत शिधापत्रिकाधारकांसाठी असलेल्या आनंदाचा शिधा उपक्रमात मैदा आणि पोह्याचा देखील समावेश करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत झाला. विदर्भ आणि मराठवाड्यातल्या कृषी पंप वीज जोडण्या वेगानं पूर्ण करण्याचा आणि उच्च दाब वितरण प्रणाली योजनेला मुदतवाढ देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळानं घेतला. दरवर्षी २७ विद्यार्थ्यांना अल्पसंख्याक विद्यार्थी परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजनेचा लाभ दिला जाणार असून नागपूरमध्ये पाच अतिरिक्त कौटुंबिक न्यायालय स्थापन करून या ठिकाणी ४५ पदांनाही आज मंजुरी देण्यात आली. इमारतींच्या पुनर्विकासाला विरोध करणाऱ्या सदनिका मालकांच्या निष्कासनाबाबत अधिनियमात सुधारणा करायला मंत्रिमंडळ बैठकीत आज मंजुरी मिळाली.

<><><><><><>

यंदाच्या पावसाळ्यात राज्यात १ जूनपासून आतापर्यंत सुमारे १ हजार ११ मिलिमीटर सरासरी पावसाची नोंद झाली. राज्यात आतापर्यंत

सरासरीच्या एकूण ९१ पूर्णांक ६० दशांश टक्के पाऊस झाला. ऑगस्टमध्ये सरासरीच्या ३८ टक्के पाऊस झाला असून सप्टेंबरमध्ये सरासरीच्या १२८ पूर्णांक ८० दशांश टक्के पाऊस पडला आहे. तर ऑक्टोबर महिन्यात आतापर्यंत सरासरी ७१ पूर्णांक १० दशांश मिलीमीटर पाऊस झाला आहे.

<><><><><>

डोंबिवलीतल्या यशराज ग्रुप संस्थेतर्फे शाहीर कृष्णराव साबळे यांना लोकगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. डोंबिवलीतले सामाजिक कार्यकर्ते मधुकर चक्रदेव यांना सन्मानित केला जाणार तर मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे माजी विभाग प्रमुख डॉ. प्रकाश खांडगे यांना लोककलेतल्या योगदानाबद्दल पुरस्कार दिला जाणार आहे. हा पुरस्कार सोहळा डोंबिवलीत ब्लॉसम इंटरनॅशनल स्कूल इथं ८ऑक्टोबर रोजी होणार आहे.

<><><><><>

नांदेड इथल्या डॉ शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात झालेल्या रुग्णांच्या मृत्यूचा आकडा आता ३१ वर पोचला आहे. जिल्हा रुग्णालय प्रशासनाने म्हटलं आहे की, रुग्णालयातले अत्यावस्थ रुग्ण तज्ञांच्या देखरेखीखाली असून त्यांना सर्व वैद्यकीय सेवा पुरवण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासन करत आहे.

जिल्हा आणि राज्याच्या इतर भागातून आलेल्या अत्यावस्थ रुग्णांची संख्या एकदम वाढल्यानं हे मृत्यू झाल्याचं डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय

वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, विष्णुपूरीच्या वैद्यकीय अधिक्षकांनी सांगितलं. या पार्श्वभूमीवर आज आरोग्य मंत्री हसन मुश्रीफ हे रुग्णालयाला भेट देऊन पाहणी करणार आहेत.ही घटना दुर्देवी असल्याचं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तर ही घटना शासकीय आरोग्य व्यवस्थेला काळिमा फासणारी आहे असं राष्ट्रवादी काँग्रेस चे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हंटलं आहे. नांदेड आणि संभाजी नगर रुग्णालयातील मृत्यू ही सरकारी हत्या असून कलम ३०२ अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

<><><><><>

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या घाटी रुग्णालयामध्ये कालपासून २४ तासांत दोन नवजात बालकांसह १० जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यात १४ दिवसांनंतर कांद्याचा लिलाव सुरु झाला आहे. लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत आज सकाळी कांद्याला सरासरी २ हजार रूपयांचा भाव मिळाला. अन्य बाजार समित्यांमध्ये देखील बाजार सुरळीत झाला. केंद्र शासनानं कांद्यावरचं निर्यात शुल्क रद्द करावं यासह विविध मागण्यांसाािठी २० सप्टेंबरपासून कांदा व्यापारी संपावर होते.

नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत काल व्यापारी प्रतिनिधींची बैठक झाली, बैठकींनंतर कांद्याचे लिलाव सुरू करण्याची तयारी व्यापाऱ्यांनी दर्शविली.

<><><><><>

गोंदिया जिल्ह्यातला नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प १ ऑक्टोबर पासून पर्यटकांसाठी पुन्हा उघडण्यात आला आहे. पावसाळा सुरु झाल्यावर ३० जून रोजी इथली जंगल सफारी बंद करण्यात आली होती.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज छत्तीसगडमध्ये विविध विकास कामांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. आदिवासी बस्तर विभागाचं विभागीय मुख्यालय असलेल्या जगदलपूर इथं त्यांनी 26 हजार कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी केली.

<><><><><>

हँगझोऊ इथल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या दहाव्या दिवशी भारतानं आणखी एक कांस्य पदक जिंकून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली. भारतानं आतापर्यंत 13 सुवर्ण, 24 रौप्य आणि 24 कांस्य अशा एकूण ६१ पदकांची कमाई केली असून, सध्या पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानावर आहे.
आशियाई स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी केलेल्या दिमाखदार कामगिरीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे.

//<><><><><>//